**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारकडून साखरेच्या निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी

- शांतता आणि सुरक्षितता कायम जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहतील असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांचं प्रतिपादन

- केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांच्या नावाची घोषणा

**आणि**

- उत्तर प्रदेशात वादळी पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ८९ जणांचा मृत्यू, ५३पेक्षा जास्त जण जखमी

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली असून यामध्ये कच्च्या, पांढऱ्या आणि शुद्ध साखरेचा समावेश आहे, ही बंदी तात्काळ प्रभावानं सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील सूचना येईपर्यंत लागू असेल. साखरेचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणं आणि स्थानिक किमतींवर नियंत्रण ठेवणं हा यामागचा उद्देश आहे. मात्र युरोपियन युनिअन आणि अमेरिकेसाठी काही विशिष्ट कोट्याकरता  अपवाद असून केवळ त्यासाठी साखरेची निर्यात केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सध्या प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत असलेल्या मालाला देखील यातून सूट देण्यात आली आहे.

**<><><><><><>**

शांतता आणि सुरक्षितता कायम जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहतील असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आजपासून ब्रिक्स देशांच्या परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांच्या परिषदेला सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीचं अध्यक्षस्थान  डॉ. एस. जयशंकर भूषवत आहेत.  जगात सध्या सुरु असलेल्या  संघर्षांमुळे संवाद आणि कूटनीतीचे महत्त्व अधोरेखित होतं,

दहशतवादाविरुद्ध सहकार्य मजबूत करण्याचीही सामायिक गरज आहे, असं ते म्हणाले.

**बाईट - डॉ एस जयशंकर**

या क्लिष्ट आणि अस्थिर जागतिक परिस्थितीत संवाद हा शाश्वत विकासाला पुढे नेणारा असावा तसंच समान मात्र भिन्न जबाबदाऱ्यांच्या तत्त्वांचं पालन केलं जावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तंत्रज्ञानातली प्रगती जागतिक परिदृश्याला आकार देत असून तिचा उपयोग सुशासन आणि सर्वसमावेशक समृद्धीसाठी करण्याचं आवाहन जयशंकर यांनी केलं. या बैठकीत ब्रिक्स सदस्य देश तसंच भागीदार देशांचे परराष्ट्र मंत्री आणि प्रतिनिधीमंडळ सहभागी झाले आहेत. या बैठकीदरम्यान जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण होणार आहे. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर डॉ एस जयशंकर यांनी विविध देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा देखील केली.

**<><><><><><>**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल अर्थात NDRF ने २० वर्षांत देशातल्या १४० कोटी नागरिकांचा विश्वास संपादन केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. गाझियाबाद इथं ‘प्रेसिडेंट्स कलर’ पुरस्कार NDRF ला देण्यात आला, त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कोणत्याही सशस्त्र दलाला राष्ट्रपती ध्वज मिळणं ही अभिमानाची बाब असल्याचं शहा म्हणाले.

कोणत्याही संकटामध्ये NDRF चं पथक मदतीसाठी धावून जाते, या पथकाच्या येण्यानं नागरिकांना मोठा दिलासा मिळतो, अशा शब्दांत गृहमंत्र्यांनी NDRF चा गौरव केला.

**<><><><><><>**

केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांचं नाव निश्चित झालं आहे. काँग्रेसने आज नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीपा

दासमुन्शी, मुकुल वासनिक आणि अजय माकन यांनी सतीशन यांच्या नावाची घोषणा केली. कोची जिल्ह्याचे मूळ रहिवासी असलेले सतीशन २००१मध्ये परवूर मतदारसंघातून केरळच्या विधानसभेवर आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून आले होते. २०२१मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेस प्रणित यूडीएफच्या पराभवानंतर सतीशन यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली होती.

**<><><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेल्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा आज शपथविधी झाला. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यात शिवसेनेच्या डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, तसंच भाजपाच्या डॉ. प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झिशान सिद्दीकी यांनीही विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली.

**<><><><><><>**

उत्तर प्रदेशात वादळी पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ८९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५३पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे राज्यभरात धुळीचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. धुळीचं वादळ आणि गारपिटीमुळे भिंत कोसळणं, झाडं किंवा विद्युत खांब अंगावर पडून लोक मृत्युमुखी पडले. सर्वाधिक मृत्यू वीज पडण्याच्या घटनांमुळे झाले आहेत. प्रयागराजमध्ये १७ जणांचा मृत्यू झाला. तर भदोही जिल्ह्यात १६ जण, मिर्झापूरमध्ये १०, फतेहपूरमध्ये ९, बदायूमधे ५ तर बरेली जिल्ह्यात ४ जण दगावले आहेत. पावसामुळे राज्यातल्या विविध भागात वीजपुरवठ्यावरही परिणाम झाला आहे. तर गारपिटीमुळे पिकांचं नुकसान झालं आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनांबद्दल शोक व्यक्त

केला असून पुढच्या २४ तासात नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

देशाच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची तर काही भागात पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

महाराष्ट्राचा काही भाग, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात पावसाचा अंदाज आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, बिहार, छत्तीसगड, ओदिशा पश्चिम बंगाल आणि पूर्वोकडील राज्यांत आज विजांच्या कडकटासह पावसाची शक्यता आहे.

येत्या तीन दिवसांत अंदामान निकोबार द्वीप समूह, केरलम, माहे, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, सिक्कीम, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल मध्ये पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

<><><><><>

गुजरातमध्ये आज पहाटे खासगी बस आणि टँकर यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर दहा जण जखमी झाले. हा अपघात सुंदरनगर जिल्ह्यात चोटीला-राजकोट राष्ट्रीय महामार्गावर झाल्याची माहिती पोलीस उपअधीक्षक एस. एस. भदोरिया दिली.

अपघातातील जखमींना उपचारासाठी राजकोट इथल्या सिव्हिल रुग्णालयात नेल्याची माहिती उपजिल्हाधिकारी एच. टी. मकवाणा यांनी दिली.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना हिमाचल प्रदेशातल्या धरमशाला इथं संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

या स्पर्धेत काल रायपूर इथं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने कोलकाता नाईट रायडर्सला सहा गडी राखून हरवले. या सामन्यानंतर स्पर्धेच्या पदक तालिकेत बंगळुरूचा संघ १६ गुण मिळवत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.

**<><><><><>**

बँकॉकमध्ये होत असलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिने महिला एकेरीच्या तर लक्ष्य सेन आणि किदाम्बी श्रीकांत याने पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. मिश्र दुहेरीत मात्र भारताच्या अशित- अमृता आणि ध्रुव-तनिशा या दोन्ही जोड्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

**<><><><><>**

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचे संचालक प्रवीण सूद यांना केंद्र सरकारनं एक वर्षाची मुदत वाढ दिली आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं सूद यांना मुदत वाढ दिल्यानंतर कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं याबाबतचा आदेश काढला. सूद यांना मुदतवाढ मिळाल्यामुळे सीबीआयकडे असलेल्या महत्त्वाच्या तपासात सातत्य राहणार आहे.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं चार मुख्य आरोपींना अटक केली आहे. या चौघांनाही राजस्थानमधल्या जयपूर इथून अटक करण्यात आली, काल त्यांना दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आलं. त्यानंतर त्यांना 'ट्रान्झिट रिमांड'वर घेऊन पुढील चौकशीसाठी दिल्लीला हलवण्यात आलं आहे. या चौघांपैकी दोघांनी राजस्थानच्या सीकर जिल्ह्यात एका कोचिंग संस्थेत एकत्र शिक्षण घेतलं होतं. सीबीआय आता कोचिंग संस्था, मध्यस्थ, विद्यार्थी आणि आरोपींशी संबंधित इतर व्यक्ती यांच्यातल्या संभाव्य संबंधांची चौकशी करत आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत राहणारे दहा हजार परदेशी विद्यार्थी व्हिसाच्या ओपीटी अर्थात ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग कॉम्पोनंटचा गैरवापर करत नोकरी करत असल्याचं आढळून आल्याचं अमेरिकेच्या स्थलांतर आणि सीमाशुल्क अंमलबजावणी विभागाने म्हटलं आहे. यात भारताच्याही अनेक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ओपीटीमुळे विद्यार्थी बारा किंवा २४ महिने अमेरिकेत काम करू शकतात. तसंच यामुळे एच वन व्हिसा मिळण्याची संधी देखील मिळते. हे विद्यार्थी अनेकदा बेकायदेशीर कृत्यांमधे गुंतल्याचंही उघड झाल्याचं स्थलांतर आणि सीमाशुल्क अंमलबजावणी विभागाचे संचालक टॉड लायन्स यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><><><>**

बीजिंगमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत महत्वपूर्ण द्विपक्षीय बैठक सुरु आहे. या बैठकीसाठी डोनाल्ड ट्रम्प, काल बीजिंग इथं दाखल झाले.

**//<><><><><><>//**